# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक १२.९.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

### (प्रशासकीय विषय)

**विषय क्रमांक ३० :-** चंद्रपुर महानगरपालिका येथुन अमरावती महानगरपालिका येथे बदलीने नियुक्ती मिळण्या बाबत.

**ठराव क्रमांक ३० :-** श्री. चिन्मय देशपांडे हे दिनांक ०१/०८/२०१७ पासून कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग, चंद्रपुर महानगरपालिका येथे कार्यरत आहे. त्यांनी त्यांचे आई वडील अमरावती येथे वास्तवास असून प्रकृतीच्या कारणास्तव त्यांची देखभाल करण्यासाठी कुटूंबात त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणी नसल्यामुळे वैद्यकीय कागदपत्रे सादर करुन चंद्रपुर महानगरपालिका येथुन अमरावती महानगरपालिका येथे कनिष्ठ अभियंता या पदावर बदलीने नियुक्ती मिळणे बाबत आयुक्त, चंद्रपुर महानगरपालिका यांचे दिनांक १०/११/२०२१ चे नाहरकत प्रमाणपत्र, तसेच चंद्रपुर महानगरपालिका सर्व साधारण सभेचे ठराव क्रमांक २९ अन्वये मंजुरी दिली आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा. अभियंता/ शाखा अभियंता/कनिष्ट अभियंता यांची एकुण ४२ पदे मंजुर असुन आजपावेतो २७ पदे कार्यरत असून एकुण १५ पदे रिक्त आहे. या १५ पदामध्ये अनुसुचित जाती-२, अनुसूचित जमाती-२, विजाअ-१, भजब-१, भजक-१,भजड-१, विमाप्र-१, आर्थिक दुर्बल दृष्ट्या-४ असे एकुण १३ पदांचा विविध प्रवर्गाचा अनुशेष आहे व अराखीव साठी ३ पदे आहेत. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१६/प्र.क्र.५०९/कार्या.१२, दिनांक १५/०५/२०१९ नुसार **"शासकीय कर्मचाऱ्यांच्या विनंतीनुसार संवर्गा अंतर्गत एका नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आरस्थापनेवरुन दुसऱ्या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या आरस्थापनेवर कायम स्वरुपी समावेशन करण्याबाबतचे धोरण"** प्रस्तृत शासन निर्णय राज्यसेवेतील गट-क कर्मचाऱ्यांना लागु होईल असे नमुद आहे. त्या अनुषंगाने श्री. चिन्मय देशपांडे, कनिष्ठ अभियंता, चंद्रपुर महानगरपालिका यांना आई वडीलांच्या प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना बदलीने अमरावती महानगरपालिका येथे अराखीव रिक्त ३ पदापैकी एका पदावर अराखीव प्रवर्गात बदली बाबत सर्वसाधारण सभा नाहरकत/संमती आवश्यक आहे. करीता प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका,अमरावती

स्वा/-
प्रशासक,
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.